ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-I October 2012

# जागतिक लोकसंख्या दिन – 11 जुलै

डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी,
सहाय्यक प्राध्यापक,
विश्वसत्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक.
आणि
प्रा. सोनाली गोविंदराव पाटील,
सहाय्यक प्राध्यापक,
विश्वसत्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक.

***सारांश:***

*देशाचा आर्थिक विकास हा लोकसंख्येच्या आकारमानावर अवलंबून असतो. जगाच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. तथापि अविकसित देशांच्या लोकसंख्येत फार मोठया प्रमाणावर व जलद वाढ होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशासमोरही लोकसंख्या प्रस्फोटाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.*

**मुख्य संज्ञा : जागतिक लोकसंख्या दिन**

**प्रास्ताविक :**

अलिकडच्या काळात लोकसंख्येच्या अभ्यासास विशेष महत्व प्राप्त झाले आहे. लोकसंख्या शिक्षण या संकल्पनेचा उगम हा कुटुंब कल्याण संस्थेच्या प्रयत्नांमधून झाल्यामुळे लोकसंख्या शिक्षणाबदल अनेक गैरसमज समाजात पसरलेले आहेत. आजही विदयार्थी, पालक व काही शिक्षकांचा असा समज झालेला दिसतो की, लोकसंख्या शिक्षण व म्हणजे शाळांमध्ये व समाजामध्ये कुटुंब नियोजनाचा प्रचार व प्रसार करणे होय. हा समज लोकसंख्या शिक्षणासाठी संकल्पना व्यवस्थित लक्षात घेणे गरजेचे आहे.

**लोकसंख्येचा अर्थ –**

**डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव –**

'मानवी साधन संपत्तीच्या विकासाचा एक भाग म्हणजे लोकसंख्या शिक्षण होय' शिक्षणामध्ये पूर्णपणे संख्यात्मक महत्व न देता लोकसंख्येची गुणात्मक वाढ होण्यासाठी संख्यात्मक बाबी त्यामध्ये

समाविष्ट झालेल्या आहेत. लोकसंख्या शिक्षण हे जाणीव जागृतीशी संबंधित नाही तर या शिक्षणाचा नाही तर या शिक्षणाचा मानवी मूल्ये आणि आणि मानवी प्रवृत्तीच्या विकासाशी देखील त्यांचा जवळचा संबंध आहे.

**व्याख्या –**

1. **फ्रँक लॉरीमेर** – व्यापक अर्थाने लोकसंख्याशास्त्रात लोकसंख्येच्या संख्यात्मक व गुणात्मक बाजूंचा अभ्यास केला जातो.
2. **डोनाल्ड ले बोग** – मानवी समुहाचा आकार, रचना व अवकाशिक विभाजन यावर आणि यात होणाऱ्या बदलांवर प्रजनन, मृत्यूदर, विवाह, स्थलांतर व सामाजिक गतिशीलता या पाच प्रक्रिंयाद्वारा जे परिणाम होतात त्याचा गणिती व सांख्यकिय अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे लोकसंख्या शास्त्र होय.
3. **डब्ल्यू जी. बर्कले** – लोकसंख्याशास्त्र हे व्यक्तीच्या वर्तणुकीशी संबंधित नसुन एकूण मानवी समूह अगर त्याच्या एखाद्याा भागाशी संबंधित असते. मानवी समुहाचे संख्यात्मक वर्णन म्हणजे लोकसंख्याशास्त्र होय.

**लोकसंख्याशास्त्र –**

**संकुचित दृष्टिकोन –**

बर्कले, स्टॅन्फोर्ड, टॉबर, कॉवस इ. तज्ज्ञांनी लोकसंख्याशास्त्राचा संकुचित दृष्टीने विचार केला आहे. डब्ल्यू. बी. बर्कले यांच्या मते मानवी समुहाचे संख्यात्मक वर्णन म्हणजेच लोकसंख्याशास्त्र होय. परंतु लोकसंख्येचा अभ्यास केवळ संख्यात्मक दृष्टिकोनतूनच झाला तर लोकसंख्या बदलाचे समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेवरील संख्यात्मक व गुणात्मक परिणाम दुर्लक्षावे लागतील लोकसंख्येच्या सामाजिक बाजूंकडे दुर्लक्ष केल्यास या शास्त्राची सामाजिक उपयुक्तता निश्चितच कमी होईल. यासाठी लोकसंख्याशास्त्राचा व्यापक दृष्टिकोन लक्षात घेणे गरजेचे आहे.

**व्यापक दृष्टिकोन –**

लोकसंख्याशास्त्राचा व्यापक दृष्टिकोनात लोकसंख्येच्या संख्यात्मक व गुणात्मक बाजूंचा विचार केला जातो.

मानवी कल्याण हे लोकसंख्याशास्त्राचे उद्‌दिष्ट असते. त्यामुळे मानवी कल्याणाशी संबंधित असलेल्या जवळपास सर्व घटकांचा लोकसंख्याशास्त्राच्या अभ्यासात समावेश होतो.

देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रावर लोकसंख्येचा प्रभाव पडतो. लोकसंख्याशास्त्र हे मुनष्यबळ, उत्पादन तंत्राची निवड, रोजगार विषयक धोरण इ. साठी मार्गदर्शक ठरते. त्याचप्रमाणे


ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-I October 2012

भूतकालीन व वर्तमानकालीन लोकसंख्येचा अभ्यास करून भविष्यकाळातील लोकसंख्येच्या आकारमानाबाबत अंदाज करते. धोरणात्मक उपाययोजना सूचविण्याचे कार्य लोकसंख्याशास्त्र करते. यावरून असे म्हणता येईल की, लोकसंख्याशास्त्राची व्याप्ती बहुविषयात्मक असून लोकसंख्येच्या संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही घटकांचा अभ्यास करणरी ही ज्ञानशाखा आहे.

**लोकसंख्येचे स्वरूप –**

लोकसंख्येत जे कमी जास्त बदल होतात त्याचा सांख्यकीय अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो. हे बदल ज्या कारणांमुळे घडून येतात ते जन्मदर, मृत्यूदर, विवाह, स्नानांतर इ. चे अध्ययन लोकसंख्या शाखात करतात.

लोकसंख्या रचनेत वयोगट : स्त्री – पुरुष प्रमाण. वार्षिक विभागणी, सरासरी आयुष्यमान, ग्रामीण व नागरी विभागणी यांचा स्थूलमानाने विचार केला जातो.




**लोकसंख्या शास्त्राचा इतर शास्त्रांशी संबंध –**

- भूगोल
- समाजशास्त्र
- अर्थशास्त्र
- संख्याशास्त्र
- कृषीशास्त्र
- जैविक व वैदयकीय शास्त्र
- पर्यावरणशास्त्र
- मानववंशशास्त्र
- शिक्षणशास्त्र

**लोकसंख्येच्या संदर्भात –**

हे तीनही पैलू महत्वाचे आहेत.

- काल
- आज
- उदया

**व्याप्ती –**

लोकसंख्याशास्त्र अभ्यासाची व्याप्ती अलिकडच्या काळात वाढलेली आहे.

1. लोकसंख्येचा साधनसंपत्तीवरील परिणाम, मर्यादा व काटकसरीने उपयोग करण्याची गरज.
2. आर्थिक आणि औदयोगिक साधनसंपत्तीमध्ये वाढ करण्याची काय गरज आहे या बाबींचा विचार.
3. लोकसंख्या शिक्षणामध्ये लोकसंख्येच्या परिणामापेक्षाही लोकसंख्येच्या रचनेला प्रगतीच्या दृष्टीने अधिक महत्व कसे
4. एकंदरीत जीवन सुखी करण्यासाठी ज्या गोष्टींची गरज आहे. त्यांचा विचार लोकसंख्या शिक्षणाच्या व्याप्तीमध्ये करावा लागणार आहे.

**लोकसंख्या वाढीची कारणे –**

**जैविक घटक –**

प्रजनन ही एक पूर्ण जीवशास्त्रीय घटना आहे. स्त्रीच्या प्रजनन क्षमतेचा काळ ? विवाहाचे वय, विवाहाच्या पध्दती, लिंगभेदानुसार वयोरचना याच्या विवाहाच्या पध्दती लिंगभेदानुसार वयोरचना याचा प्रजननाच्या दरावर परिणाम होतो.

**सामाजिक व सांस्कृतिक घटक –**

या घटकाचा विचार प्रामुख्याने धार्मिक व वांशिक रचना, आरोग्य शिक्षण, साक्षरता विवाहाच्या पध्दती, कुटुंब संस्थेकडेपाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन, सामाजिक धार्मिक परंपरा, रूढी इ.

**आर्थिक घटक –** आर्थिक घटक हा लोकसंख्येत वाढीच्या संदर्भात महत्वाचा घटक ठरतो. तांत्रिक व वैज्ञानिक प्रगतीमुळे राहणीमानाचा स्तर उंचावतो. व लोकसंख्यावाढीला पायबंद बसतो.

**भारतातील जन्मदर सन 1951 ते 2011 –**

| वर्ष | लोकसंख्या | जन्मदर |
|---|---|---|
| 1951 | 361,088,000 | ––– |
| 1961 | 439,235,000 | 21.6% |
| 1971 | 548,160,000 | 24.8% |
| 1981 | 683,329,000 | 24.7% |
| 1991 | 864,387,888 | 23.9% |
| 2001 | 1,028,737,436 | 21.5% |
| 2011 | 1210,193,422 | 17.6% |

**लोकसंख्या वाढीचे परिणाम –**

- → आरोग्य
- → ग्रामीण नागरी तफावत
- → शैक्षणिक समतोल
- → रोजगाराचे क्षेत्रीय विभाजन
- → वाढते शहरीकरण
- → उर्जेचा वापर
- → उग्रवाद, गुन्हे
- → स्थिती
- → अन्नपुरवठा
- → नैसर्गिक साधनसंपत्तीचा ताळेबद
- → बेकारी
- → रोजगार
- → शैक्षणिक स्थिती
- → मानवी हाल अपेष्टा

**लोकसंख्या आणि पर्यावरण –**

लोकसंख्या आणि पर्यावरण एकाच वेळी परस्परपूरक आणि परस्पर स्पर्धकही असतात. जोपर्यंत मानवी जीवनही सुरक्षित आहे. या अर्थाने पर्यावरण आणि लोकसंख्या परस्परपूरक असतात. मात्र वाढत्या लोकसंख्याबरोबर केवळ निसर्गाने पुरविलेली उपजीविकेची साधने असतात. मात्र वाढत्या लोकसंख्येबरोबर केवळ निसर्गाने पुरविलेली उपजिविकेची साधने अपुरी पडु लागतात.

पर्यावरण संरक्षण आधुनिक युगात एक खर्चिक बाब बनली आहे. विकसनशील देशांना त्याचा खर्च परवडेनासा झाला आहे. हे संकट जागतिक पातळीवर निवारण करण्यासाठी 1991 मध्ये जागतिक पर्यावरण सुविधा (Global Enuironmental Facility) स्थापन करण्यात आली. विकसनशील देशांना त्यांच्या देशातील पर्यावरण संरक्षण गुंतवणुकीसाठी आर्थिक मदत पुरविणारी ही सेवा आहे ही मदत चार कारणांसाठी पुरविली जाते.

1. वातावरणात्मक बदल
2. जैविक विविधता टिकविणे
3. ओझोनचा स्तर सुरक्षित ठेवणे
4. आंतरराष्ट्रीय प्राण्यांचे संरक्षण

**लोकसंख्या आणि शिक्षण ( Population Education ) :**

सामान्य शिक्षण किंवा साक्षरता संकल्पनेपेक्षा लोकसंख्या शिक्षण ही संकल्पना निराळी आहे, नविन आहे. भारतात 'लोकसंख्या शिक्षण' ही संकल्पना 1980 नंतर आली आणि 1990 पर्यंत ती देशभरातील शालेय शिक्षणात अनिवार्य म्हणून आली.

लोकसंख्या शिक्षण म्हणजे असे अध्ययन आणि अध्यापन ज्यात शिक्षणार्थींना गर्भधारणा, जनन, मृत्यू इ. संबंधीची मूलभूत माहिती दिली जाते. तसेच निरनिराळया वयोगटातील विदयार्थी विदयार्थिनींना कसे आणि कितपत लैंगिक शिक्षण दयावे यासाठी चिंतन केले जाते.

लोकसंख्या शिक्षणाचा आशय देखील विदयार्थ्यांच्या प्रत्येक पिढीबरोबर बदलु शकतो. प्राथमिक व उच्च शिक्षण या निरनिराळया पातळयांवर लोकसंख्या शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठयांशाचा आशय निराळा असावा आणि वैदयकिय शिक्षणात तो सर्वस्पर्शी असावा.

लोकसंख्या शिक्षणाचा आशय देश, काळ आणि परिस्थितीनुसार वेगवेगळा असतो. जर लोकसंख्या कमी असलेल्या देशांमध्ये लोकसंख्या शिक्षण दयायचे असेल तर शिक्षणार्थींना घटत्या लोकसंख्येच्या समस्येबददद्दल चिंता व्यक्त करणारे शिक्षण दयावे लागेल. अपुऱ्या लोकसंख्येमुळे साधन – संपत्तीचा वापर, संरक्षण हे प्रश्न कसे अवघड होत आहेत. बालके आणि वृध्दांची अवलंबून असणाऱ्यांची लोकसंख्या कर्त्या लोकसंख्येवर कसा वाढता बोजा टाकीत आहे याबद्दल जागृती करणारा आशय लोकसंख्या शिक्षणातून दयावा लागेल. याउलट जास्त लोकसंख्या असलेल्या देशात शिक्षणातून लोकसंख्या प्रस्फोटाची समस्या, लोकसंख्या आणि तिच्या रचनेतील गतिमान बदल, लिंग, प्रमाणातील विषमतेची कारणे, अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा बोजा, लोकसंख्येच्या आरोग्य पातळीचा कमी दर्जा, असाधारणपणे अधिक असणारा सर्वसाधारण जननदर आणि शुध्द प्रजनन दर वाढती लोकसंख्या आणि पर्यावरणाचा घसरणारा दर्जा जबाबदार पालकत्व यासारख्या पाठयांशावर भर दयावा लागेल.

प्रचंड वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येत आर्थिक व तंत्रवैज्ञानिक प्रगती लाभ अल्प प्रमाणात विभागले जातात. तरी देखील प्रचंड लोकसंख्या हा एक प्रमुख अडसर आहे. म्हणूनच लोकसंख्या वाढीस आवर घालणारे आणि त्याबरोबरच लोकसंख्येची गुणवत्ता वाढीस लावणारे लोकसंख्या शिक्षण हवे. लोकसंख्या समस्येकडे केवळ जनसंख्येच्या दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे नसते देशाला उपलब्ध असलेली साधनसंपत्ती व तिचा प्रत्यक्ष वापर, देशात वापरले जाणारे तंत्रज्ञान, औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीचा वेग, देशाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास, लोकांची राहणीमान पातळी आणि पर्यावरणात्मक समतोलाची स्थिती यांच्या संदर्भात लोकसंख्या समस्येची जाण, लोकसंख्या शिक्षणातून निर्माण व्हावी.

लोकसंख्या शिक्षणातून लोकसंख्या वाढीचा लोकसंख्येचा उपयोग एक अडसर किंवा समस्या समजून न घेता एक शक्ती म्हणून केल्यास अनेक विधायक कामे करण्यासाठी जर करून घेतल्यास देशाच्या प्रगतीस हातभारच लागेल.

**सहशालेय व शाळाबाह्य कार्यक्रमाद्वारे लोकसंख्या शिक्षण –**

सहशालेय कार्यक्रमामधून लोकसंख्याशिक्षण अनुभवाचे दोन प्रकार आहेत.

- ज्ञानार्जन व कौशल्य संपादन घेणे.

- अनुभवातून मूल्ये, वृत्ती, सवयी यांची घडण होते.

  याची घडण लोकसंख्या शिक्षणामधून करायची आहे.

**लोकसंख्या शिक्षणासाठी सहशालेय कार्यक्रम –**

- राष्ट्रीय भावना वाढविण्यासाठी थोर पुरुषांची जयंती, पुण्यतिथी साजरी करुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रपुरुषांमधील गुण बाणविण्याचा प्रयत्न करणे.
- जबाबदारीची जाणीव करुन देण्यासाठी विद्यार्थी – समिती, मंत्रिमंडळ, शिक्षक दिन यामधून विद्यार्थ्यांना स्वतः वरील जबाबदाऱ्या पार पाडण्याचे अनुभव द्यावेत.
- निरनिराळ्याा वृत्ती व रुची वाढविण्यासाठी निरनिराळे छंद, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा या मार्फत विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढविणे.
- महान व्यक्तिमत्वाचे दर्शन, चारित्र्यसंपन्न व्यक्तींचे उत्सव साजरे करुन सामाजिक मूल्यांची माहिती करुन देणे. मूल्ये आचरणात आणण्यास सांगावे. उदा. गुरुपौर्णिमा, आईनस्टाईन स्मृतिदिन, रवींद्रनाथ टागोर वैगेर.
- सामूहिक जीवनाचा आनंद मिळविण्यासाठी शिबिरे, स्नेहसंमेलने यासारखे कार्यक्रम आयोजित करुन एकत्रित राहण्याचा आनंद द्विगुणित करणे.
- वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी वैज्ञानिक प्रदर्शन भरविणे, जत्रा भरविणे, वार्ता लिहिणे, शास्त्रज्ञांची चरित्रे सांगणारे दिन साजरे करणे, जेणेकरुन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करता येईल.
- कर्तव्ये व हक्कांची जाणीव देणे – प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, युनो दिन, मानवी हक्क दिन, महिला दिन या दिनांचे महत्व स्पष्ट करावे हक्काबरोबर कर्तव्यपालनाचे महत्व पटवावे.

**लोकसंख्या शिक्षणाचे उपक्रम –**

लोकसंख्येच्या गतिमानतेसंबंधी निष्कर्श काढण्यासाठी गावातील / खेड्याातील / वॉर्डातील / महापालिकेतील / ग्रामपंचायतीतील वॉर्ड ऑफीसमधून माहिती गोळा करणे व त्याआधारे निष्कर्श काढणे.

- जन्माला आलेल्या बालकांमधील मुलांचे व मुलींचे प्रमाण.
- वर्षातील मृत्यूची सर्वसाधारण कारणे.
- वर्षातील मृत्यूमधील रोगाचे प्रमाण, कारण या रोगांवरील प्रतिबंधक उपाय.

- जन्म, मृत्यूदरातील वार्षिक परिवर्तन
- वर्षातील मृत्यूचे वयोगटानुसार व लिंगानुसार वर्गीकरण
- एकूण लोकसंख्येतील स्त्री—पुरुयांचे प्रमाण
- निबंध स्पर्धा व वादविवाद स्पर्धा घेणे.

**इतर शिक्षण –**

- ग्रंथपालाशिवाय ग्रंथालय चालविणे.
- शिक्षकाशिवाय एखाद्या दिवशी वर्ग चालविणे.
- अल्पबचत योजनेचा प्रसार करणे.
- व्यायामाचे वर्ग चालविणे.
- वृक्षारोपण करुन संवर्धन करणे.
- छंदवर्ग चालविणे.
- शालेय परिसर स्वच्छ ठेवणे.
- विद्येशिवाय शालेय सहकारी भांडार चालविणे.
- गरीब विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे.

**संदर्भ –**

1. 'लोकसंख्या शिक्षण', प्रा. शिल्पा कुलकर्णी, डायमंड प्रकाशन पुणे.
2. 'लोकसंख्याशास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण', डॉ. एस. एन. कुलकर्णी, डॉ. सतीश श्रीवास्तव, विद्या प्रकाशन, नागपुर.
3. 'लोकसंख्या आणि समाज', डॉ. दिलीप खैरनार
4. 'लोकसंख्या शिक्षण', डॉ. बा. ग. अहिरे, डॉ. कै. बोंदार्डे
5. www.populationassciation.org/publl.
6. www.populationreview.com/
7. www.populationmedia.org/
8. www.populationeducation.org/docs/w.